# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद
शासकीय तंत्रनिकेतनच्या बाजूला, उस्मानपुरा

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०

http://www.dteau.org roaurangabad.dte@gmail.com


## कार्यालयीन आदेश

जा.क्र.विकाऔ/आस्था-३/पदोन्नती/२०१७/१८८४

दिनांक :- 31 MAY 2017

संदर्भ :- १. शिक्षण व सेवा योजन विभाग शासन निर्णय क्र.टिईएम/३३८९/५५९०९/ तांशि-१ अ, दिनांक १६-०६-१९८९

२. उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग शा.नि.क्र.जिईसी/३३९६/ (७३७६)/तांशि-१, दिनांक १०-४-१९९७

३. सामान्य प्रशासन विभाग शा.नि.बीसीसी-१२०७/प्र.क्र.५३/०८/१६ ब, दि. १६.०६.२००८

सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद यांना उपरोक्त संदर्भिय शासन निर्णय क्र. १ व २ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन खालील दर्शविलेल्या कर्मचा-यांना **"लघुलेखक"** वेतनश्रेणी ( PB-2) **Rs. 9300-34800/- Gr.Pay 4300/-** या पदावर पदोन्नती देण्यात येत असून त्यांची पदस्थापना त्यांच्या नावांसमोर स्तंभ ४ मध्ये दर्शविलेल्या ठिकाणी करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कर्मचा-याचे नांव,पदनाम व कार्यालय | पदोन्नतीचा प्रवर्ग | पदोन्नतीच्या पदावरील पदस्थापनेचे ठिकाण/कार्यालयाचे नांव |
|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ |
| १ | श्री. एस. बी. वाघ, लघुटंकलेखक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ प्रा. का., औरंगाबाद | खुला | महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ प्रा. का., औरंगाबाद येथे रिक्त असलेल्या **लघुलेखक** (नि.श्रे.) या रिक्त पदावर |

वर नमूद केलेली पदोन्नती खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

१. सदर पदोन्नत्या मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने दिनांक २८.११.२०१४ रोजी दिलेल्या निर्णयाविरुध्द मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या रिट याचिका क्र.२७९७/२०१५ च्या अंतीम निर्णयाच्या अधिन राहतील.

२. पदोन्नती देण्यात आलेल्या वरील कर्मचा-यांनी तात्काळ पदोन्नतीच्या पदावर रुजू व्हावे. जे कर्मचारी पदोन्नतीचे पद स्विकारण्यास नकार दर्शवतील, त्यांना सदर पदोन्नती स्विकारण्यास स्वारस्य नसल्याचे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

३. सदर कर्मचा-यांची वरील संवर्गातील सेवा जेष्ठता ही विहीत मुदतीत सदर पदावर हजर होण्यावर अथवा मुदत वाढीवर अवलंबून राहील.

४. पदोन्नतीमुळे संबंधीतांना वेतननिश्चिती बाबतचा विकल्प शासन निर्णय वित्त विभाग क्र.वेतन/१०८२/सीआर-११००(एक)/सेवा-३,दि.०६ नोव्हेंबर, १९८४ मधील तरतुदीनुसार रुजू होण्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत कार्यालयात सादर करावा लागेल.

५. पदोन्नतीने बदली झालेल्या कर्मचा-यांना त्यांच्या संस्था प्रमुख/कार्यालय प्रमुखांनी तात्पुरती पर्यायी व्यवस्था करुन तातडीने कार्यमुक्त करावे.

६. कर्मचा-यांच्या पदोन्नतीने नियुक्त्या या व्यापक लोकहितार्थ व प्रशासकीय कारणास्तव करण्यात आलेल्या असल्या कारणाने सदर आदेशाविरुध्द कोणत्याही अभिवेदनाचा विचार केला जाणार नाही.

सदर आदेशाची अंमलबजावणी त्वरित होणेसाठी कार्यालय प्रमुखांनी संबंधीत कर्मचा-यास पर्यायी व्यवस्था करुन त्वरीत कार्यमुक्त करावे. तसेच संबंधित कर्मचा-याने नियुक्तीच्या ठिकाणी विनाविलंब रुजू व्हावे.

(महेश शिवणकर)
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

**<u>प्रत :- माहिती व योग्य कार्यवाहीस्तव.</u>**

१. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहीतीस्तव सविनय सादर.
२. उपसचिव, महाराष्ट राज्य तंत्रशिक्षण मंडळ प्रा. का., औरंगाबाद
३. वरीष्ठ कोषागार अधिकारी, वरिष्ठ कोषागार कार्यालय,औरंगाबाद
४. संबंधीतांस (कार्यालय प्रमुखांमार्फत) अनुपालनास्तव.
५. वैयक्तीक नस्ती.